## रे.मु.नं.९६/१४ मधील नि.क.३० वरील आदेश

**कृष्णा घरत, वगैरे** ... **वादी**
**वि.**
**नामदेव घरत, वगैरे** ... **प्रतिवादी**

१) सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ७ नियम ११-ड अन्वये दावा फेटाळण्याकरीता दाखल केला आहे. सदर अर्जास वादींनी नि.क्र. ३३ वर म्हणणे दाखल केले आहे. प्रकरणात दाखल कागदपत्रे पाहिली.

२) प्रतिवादी क्र. १ तर्फे वकीलांनी असा युक्तिवाद केला आहे की, वादींनी सदरचा दावा जाहीर ठरावाकरीता व निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. परंतु वादींच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीचे भू संपादन होत असताना फेरफार क्र.२३०५ अनुसार ॲवार्ड करण्यात आले. फेरफार क्र.२३०५ व त्याअनुशंगाने दावा मिळकतीबाबत झालेले मौजे शेवे येथील ॲवार्ड वादींवर बंधनकारक नाही असे वादींचे म्हणणे आहे. त्याकरीता त्यांनी जाहिर ठराव व निरंतर मनाई हुकूम मागितला आहे. सदर ॲवार्डविरुध्द कोणतेही अपिल वादींनी दाखल केलेले नाही. सदर ॲवार्ड रदद करण्याचे अगर त्यामध्ये फेरबदल करण्याचे अधिकार या न्यायालयास नाहीत. त्यामुळे त्यांचा अर्ज मंजूर करुन वादीचा दावा फेटाळण्यात यावा.

३) याउलट वादींचे विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला आहे की, सदरचा अर्ज खोडसाळपणाचा आहे. वादींनी प्रस्तुत प्रकरणामध्ये संपादित मिळकतींच्या ॲवार्डबाबत हरकत घेतलेली नव्हती. त्यांनी दावा मिळकतीमध्ये त्यांचा सामाईक हिस्सा जाहिर करुन मिळण्याची मागणी केली आहे. त्यामुळे जेव्हा ॲवार्डबाबत कुठलीही मागणी त्यांनी केलेली

नसल्याने तथाकथित अर्ज हा गैरलागू असून तो फेटाळण्यात यावा.

४) प्रकरणात दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला व दाखल कागदपत्रे पाहिली असता असे दिसून येते की, वादींनी सदरचा दावा जाहिर ठरावाकरीता व निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ ने सदरचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ७ नियम ११(ड) नुसार रदद करावा अशी मागणी केली आहे. परंतु, वादीचा दावा पाहता त्यांनी त्यांच्या विनंती कलमामध्ये प्रतिवादी क्र. १ ने अर्जात नमूद केल्याप्रमाणे फेरफार क्र.२३०५ व त्याअनुशंगाने दावा मिळकतीबाबत झालेले मौजे शेवे येथील ॲवार्ड वादींवर बंधनकारक नाहीत याबाबतचा जाहिर करार व निरंतर मनाई मागितल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ च्या सदर अर्जातील कथनांनुसार दावा नाकारणे न्यायोचित होणार नाही. प्रतिवादींना सदर दाव्यात त्यांची बाजू मांडण्याची कायदयानुसार योग्य ती संधी निश्चितच आहे. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज निव्वळ दाव्याचे कामकाज लांबणीवर पडावे या हेतूने दिल्याचे दिसून येते. त्यामुळे तो फेटाळण्यास पात्र आहे. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | प्रतिवादी क्र. १ चा अर्ज (नि.क्र.३०) नामंजूर करणेत येत आहे. |
| २. | खर्चाबाबत कोणताही आदेश नाही. |
| | (आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.) |

उरण. (प्रि.म.पाटील)
दिनांक : १५/१०/२०१८ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.